जिल्हा व सत्र न्यायालय — जळगांव.
<u>जाहीर निविदा.</u>

कार्यालयाचे नाव :— जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव.

या कार्यालयाच्या दैनंदिन वापरासाठी झेरॉक्स कागद (Reflection 75 GSM paper A4 Size) एकूण ५०० रिम अधिकृत पुरवठादार/डिलर यांच्याकडून सीलबंद पाकिटात दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

साहित्याचा तपशील :—

साहित्याचे नाव	:	झेरॉक्स कागद (Reflection)
माप व जाडी	:	A4 Size & 75 GSM
एकूण संख्या	:	५०० रिम

महत्वाच्या तारखा व वेळ :

दरपत्रक सादर करण्याची अंतिम तारीख : दिनांक ०८/१०/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत.

दरपत्रक उघडण्याची तारीख व ठिकाण : दिनांक १२/१०/२०२६ रोजी मा. जिल्हा न्यायाधीश—१, जळगांव यांचे निजी कक्षात सकाळी १०.३० वाजता.

मुख्य अटी व शर्ती :—

१. इच्छुक पुरवठादारांनी आपली दरपत्रके सीलबंद पाकिटात त्यावर झेरॉक्स कागद (Reflection A4 Size, 75 GSM) पुरविणेबाबतचे दरपत्रक असा स्पष्ट उल्लेख करून मुदतीपुर्वी सादर करावीत दि.०८/१०/२०२६ नंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा कोणताही विचार केला जाणार नाही.

२. दरपत्रक स्विकारल्यानंतर पाच दिवसात उपरोक्त वस्तुंचा पुरवठा जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव येथे स्वखर्चाने करावा लागेल. तसेच सदरील वस्तुंचा दर्जा उत्कृष्ट आणि उच्च प्रतीचा असावा नसल्यास स्विकारला जाणार नाही.

३. दरपत्रक स्विकारण्याचा/नाकारण्याचा तसेच अनुदानाअभावी कमी—जास्त प्रमाणात खरेदी करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांच्याकडेस राखुन ठेवला आहे. दरपत्रक भरतांना दर अंकात व अक्षरी असे दोनही प्रकारे भरावेत.

४. दरपत्रक सर्व करांसह दरपत्रक भरावे. मात्र जीएसटी टॅक्सचा स्वतंत्र दर नमुद करावा. तसेच बिलाची रक्कम अदा करतांना नियमानुसार टी.डी.एस.कपात करण्यात येईल.

५. उपरोक्त वस्तु उधारीवर खरेदी करावयाचे आहेत. तसेच सदर बीलाची रक्कम अनुदान उपलब्धतेनुसार देण्यात येईल.

२.....

६. दरपत्रक उघडण्याच्या दिवशी व नमुद वेळी पुरवठादारांनी प्रत्यक्ष हजर रहावे अथवा प्रतिनिधी पाठवावा अन्यथा त्यांच्या गैरहजेरीत दरपत्रक उघडण्यात येतील.

७. दरपत्रकातील दर दिनांक ३१.१२.२०२६ अखेर कार्यरत राहतील. अगर त्यानंतरही त्याच दरात पुरविली जातील त्या कालावधीचा खुलासा स्पष्ट करावा.

८. नमुद वस्तूंचा पुरवठा आदेश देवूनही मुदतीत न केल्यास पुरवठा आदेश रद्द करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांनी राखून ठेवला आहे.

म.जा.क./५८४/२०२६
जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव
दिनांक ०१/१०/२०२६.
03

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
जळगांव

प्रत माहिती करीता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दी करीता.

१. म.जिल्हाधिकारी,जळगांव.
२. म.तहसिलदार,जळगांव.
३. म.दिवाणी न्यायाधिश व.स्तर,जळगांव.
४. जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव.
५. मुख्य न्यायदंडाधिकारी,जळगांव.
६. जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर